सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६,

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

क्रमांक :- तंशिस/विकाना/डीबीटी पोर्टल /२०२१/ 1092 दिनांकः- 08 APR 2021

प्रति,
प्राचार्य /संचालक,
शासकीय,अनुदानित, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,
नागपूर विभाग. नागपूर

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता महाडिबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणा-या योजनांच्या कार्यवाहीबाबत.

संदर्भ :- १) या कार्यालयाचे पत्र क्र. तंशिस/विकाना/डिबीटी पोर्टल/२०२१/८७२/ दि. १६/०३/२०२१
२) मा. संचालक,तंशिसं,म.रा.मुंबई यांचे कार्यालयाचे पत्र. क्र.१८/तंशिसं /डीबीटी /विकाप/२०२१ / १४३ दि.०६/०४/२०२१

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता महाडिबीटी पोर्टलवरील, शिष्यवृत्ती योजना दि. ०३/१२/२०२० पासून सुरु झालेली असुन पात्र विद्यार्थ्याकडून लवकरात लवकर अर्ज भरून घेण्याबाबत तसेच सदर अर्ज तपासणी करून या कार्यालयास पाठविण्यांबाबत याआधीच संदर्भिय पत्र क्र. ०१ अन्वये आपणांस कळविण्यांत आलेले आहे. परंतु संस्थास्तरांवर व विद्यार्थ्यांच्या लॉगीन मध्ये बरेच अर्ज प्रलंबित असल्याचे दिसून येते. तरी आपल्या मार्फत त्रुटी अभावि विद्यार्थ्यांना पाठविण्यांत आलेल्या अर्जावर (Sent Back to applicant) तात्काळ कार्यवाही करण्यांबाबतच्या सुचना विद्यार्थ्यांना देण्यांत यावे.

तथापि संदर्भिय पत्र क्र. ०२ अन्वये महाडिबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांना अर्ज भरून मंजूरीस्तव वरीष्ठ कार्यालयास पाठविण्यांकरिता दि. १५/०४/२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यांत आलेली आहे. **परंतु अंतिम मुदती पर्यंत अर्ज प्रलंबित न ठेवता वेळेमुदतीच्या आत म्हणजेच दि. १२/०४/२०२१ पर्यंत विद्यार्थ्यांचे छाननी केलेलेच अर्ज या कार्यालयास पाठविण्यांत यावे. जेणे करून पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज या कार्यालयामार्फत वरीष्ठ कार्यालयास पाठविणे शक्य होईल. जर पात्र विद्यार्थी अर्ज भरण्यापासून किंवा संस्थांस्तरावर प्रलंबित कारणाने, वंचित राहिल्यास याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्राचार्यांची राहील याची नोंद घ्यावी.**

(डॉ. मनोज भा. डायगव्हाणे)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर

प्रतः- मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय ,म.रा.मुंबई, यांना माहितीकरिता सविनय सादर.